# स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ नांदेड

# एम.फील मराठी

जून २०१३ पासून प्रस्तावित अभ्यासक्रम

सत्र पहिले

**अभ्यासप्त्रिका – पहिली : संशोधन पध्दती**

अभ्यासप्त्रिका – दुसरी : साहित्य व सामाजिकशास्त्रे

अभ्यासप्त्रिका – तिसरी : साहित्य समीक्षा व संलग्न अभ्यासक्षेत्रे

अभ्यासप्त्रिका – चौथी : माहिती तंत्रज्ञान व मराठी वाड्मयाचे अध्यापन

l= nql js

y?kq'kks/k iza.c/k

ekSf[kdh

ppkZl=

अभ्यासक्रमाची उदिष्टये :–

1. संशोधनाची संकल्पना समजून घेता येईल.
2. साहित्य संशोधनाचे स्वरुप समजून घेता येईल.
3. साहित्य संशोधनाचे महत्व लक्षात घेता येईल.
4. साहित्य संशोधन व सामाजिक संशोधनाचे वेगळेपण समजून घेणे.
5. साहित्य संशोधनाची आवड निर्माण करणे.
6. साहित्य व भाषा संशोधन समजून घेणे.
7. साहित्य संशोधनाच्या पध्दती समजून घेणे.
8. साहित्याचा इतर शास्त्राशी असणारा संबंध समजून घेणे.
9. साहित्य इतिहासासंबंधी संशोधनात्मक दृष्टी वाढीस लावणे.
10. मराठी भाषा संशोधनासंबंधी नवनवीन दृष्टीकोन विकसीत करणे.

# अभ्यासपत्रिका – पहिली – संशोधन पध्दती

1. संशोधन : संकल्पना व स्वरुप

    संशोधनाच्या प्रेरणा, व्याख्या व स्वरुप

    वैज्ञानिक, सामाजिक, मानव्य शास्त्रीय संशोधनाचे स्वरुप

    संशोधनाचे प्रकार : तात्विक, उपयोजित, वर्णनात्मक, प्रयोगपरीक्षणात्मक, कृतिसंशोधन

    संशोधनात्मक साधन निर्मिती : कार्यपुस्तिका, हस्तपुस्तिका, संगणकीय प्रणाली, शैक्षणिक कोडी व खेळ, ज्ञानसंपादन चाचण्या, भाषांतर पाठमाला, रूपांतरणे, कोशनिर्मिती, दर्शिका (slides), साधनांची उपयुक्तता व मूल्यमापन

    संशोधन साधने : सूची, कोशवाड्मय, अभिलेख, शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, पत्रे, रोजनिशा, वृतांत, आत्मकथने, नियतकालिके, माहितीमहाजाल (Internet) संगणकीय प्रणाली, संशोधकाच्या अंगी असणारे गुण.

2. संशोधन प्रक्रिया :

    संशोधन प्रकल्पाचा हेतू, व्याप्ती व महत्व

    विषय निश्चिती, पूर्वसंशोधनाचा आढावा

    गृहीतक निश्चिती

    संशोधन आराखडा

    सामग्री संकलन व संकलन पध्दती:

    निरीक्षण, सहभागी निरीक्षण, मुलाखती, गटचर्चा, सर्वेक्षण व क्षेत्रपहाणी, ध्वनिमुद्रण, चित्रीकरण, पुट्रिकांचा वापर, प्रबंधाची प्रकरणनिहाय मांडणी, टिपा–तळटिपा, विषय व व्यक्तिनामसूची, उल्लेख सूची, संदर्भसूची

3. संशोधन पध्दतीः

ऐतिहासिक संशोधन पध्दती

वर्णनपर पध्दती

सर्वेक्षण पध्दती

प्रायोगिक संशोधन पध्दती

व्यष्टी अभ्यास(Case study)/ नमुना अभ्यास पध्दती

तुलनात्मक पध्दती

4. वाड्मयाचे संशोधनः स्वरूप व व्याप्ती

वाड्मयीन संशोधनाची अभ्यास क्षेत्रे : सांस्कृतिक पार्श्वभूमी, साहित्यकृती, वाड्मयप्रकार, लेखक–वाचक, भाषा, कालखंड, संहिता संपादन व विश्लेषण समीक्षा व संशोधन परस्पर संबंध

वाड्मयाची अर्थनिर्णयन प्रक्रियाः

अ– रूपकात्मकता, अर्थसंदिग्धता, प्रतिकात्मकता, मिथक विश्लेषण, नाद लय छंद व अलंकरणतत्व, फॅटसी, निसर्गाचे मानुशिकीकरण

आ– सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, तत्वज्ञानात्मक अर्थनिर्णयन

आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन

5. मराठीतील संशोधनपरंपरा व संशोधक

संस्कृती अभ्यास वि.का. राजवाडे,शं.दा. पेंडसे, इरावती कर्वे, शं.बा. जोशी

भाषाविषयक संशोधन वि.का. राजवाडे, ना.गो. कालेलकर, शं.गो. तुळपुळे, श्री. रं. कुलकर्णी इ.

लोकवाङ्मय साने गुरूजी, दुर्गा भागवत, प्रभाकर मांडे, रा.चिं. ढेरे, तारा भवाळकर

मध्ययुगीन वाड्मय वि.ल. भावे, वि.भि. कोलते, श्री.व्यं. केतकर, रा.श्री. जोग, श्री.रं. कुलकर्णी

अर्वाचीन वाड्मय

6. शोधनिबंधाची लेखन प्रक्रियाः

शोधनिबंधाचे लेखन

प्रबंध लेखनाच्या प्रक्रियेचे टप्पे

प्रबंध लेखनाची भाषा

प्रबंध सिध्दीची प्रक्रिया आणि अडचणी

संदर्भसूची निर्देशसूची

परिशिष्टये, कोष्टके, तालिका, आकृत्या

# अभ्यासपत्रिका – दुसरी – साहित्य आणि सामाजिकशास्त्रे

साहित्य आणि संस्कृती :

1. संस्कृतीच्या व्याख्या व स्वरूप भौतिक आणि अभौतिक
2. संस्कृती आणि समाजसंबंध
3. मानवी संस्कृतीचे टप्पेः
   – कृषीपूर्व अवस्था
   –कृषिसंस्कृती
   –उद्योग संस्कृती
   – संयोजन संस्कृती नागरी संस्कृती
4. संस्कृती आणि साहित्यसंबंध
   – कलाविष्कार ही आदिम प्रेरणा
   – भाषेची निर्मिती
   – संस्कृतीशी अनुबंध आणि साहित्यविष्कार
   – प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन कालखंडातील साहित्यामधील सांस्कृतिक स्थित्यंतरे
   – मानवविकासाचे साहित्यातून घडणारे प्रत्यंतर
   – लोकसाहित्य, मिथ्थकथा इ.

1. साहित्य व सामाजिक शास्त्राची पार्श्वभूमी
2. साहित्य आणि मानसशास्त्र
   1. मानसशास्त्राची व्याख्या व स्वरुप
   2. मानसशास्त्रातील काही महत्वाच्या संकल्पना
   3. आधुनिक मानसशास्त्रीय सिध्दांताचा साहित्यावरील परिणाम फ्राईडचे सिध्दांत, संज्ञाप्रवाही निवेदनपध्दती इ.
   4. साहित्यनिर्मितीचा विचार

– चरित्रात्मक संशोधन पध्दतीचा संबंध

–साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वाशी संबंध

5. साहित्यांच्या आकलनास मानसशास्त्राचे साहायय

– प्रतिमाविचार, आदिबंध इ.

6. वाचकांच्या आस्वादप्रक्रियेच्या आनुषंगाने विचार

– स्वप्नपूर्ती, वाचक– प्रतिसाद इत्यादी

3. साहित्य आणि तत्वज्ञानः

– तत्वज्ञान व्याख्या व स्वरूप

– तत्वज्ञानाचा जीवनाची संबंध

– तत्वज्ञानाचासाहित्यावरील परिणाम

–साहित्याचे तत्वज्ञान

– आधुनिक तत्वप्रणालीचा साहित्यनिर्मिती व समीक्षेवरील प्रभाव

4. साहित्य आणि समाजशास्त्र :

– साहित्य आणि समाज यांचे अन्योन्य संबंध साहित्याची निर्मितीप्रक्रिया, साहित्यिकाची घडण, भाषा, आस्वाद यांच्या संदर्भात.

– समाजशास्त्राची व्याख्या व स्वरुप

– समाजशास्त्राची सामग्री म्हणून साहित्याचा वापर

– साहित्याचे आकलन आणि साहित्याचा अभ्यास यांसाठी समाजशास्त्राचे साहाय्य

– साहित्याचे समाजशास्त्र

5. साहित्य आणि राज्यशास्त्र राजकीय स्थित्यंतरे व घडामोडीः

– विभिन्न राजकीय प्रणाली

–आदर्श राज्यव्यवस्था व साध्य करण्याच्या पध्दतीमधील मतभिन्नता

लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, गांधीवाद

– राजकीय विचारप्रणालींचा साहित्याशी संबंध

–साहित्यनिर्मिती, साहित्याचे आकलन व मुल्यामापन इ. संदर्भात.

– साहित्य आणि प्रचार सामाजिक बांधिलकीच्या संदर्भात

– साहित्याचे राजकारण दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इ. वाङ्मयीन प्रवाहांच्या आनुषंगाने

6. साहित्य आणि इतिहास :

– इतिहासाची व्याख्या व स्वरूप

– ऐतिहासिक स्थित्यंतरे व साहित्यातील परिवर्तन

– इतिहासाचे साधन म्हणून साहित्याचा वापर

– साहित्याची सामग्री म्हणून इतिहासाचा उपयोग

– कालानुसार इतिहासाकडे पाहण्याच्या साहित्यिकांच्या दृष्टिकोणात होणारा बदल निवडक कलाकृतींच्या आधारे

अभ्यासपत्रिका – तिसरी – साहित्य समीक्षा व संलग्न अभ्यासक्षेत्रे

1. समीक्षा आणि साहित्य अनुबंध
2. समाज साहित्य आणि भाषा
3. वाड्मय आणि शैली
4. वाड्मयीन वाद –अभिजातवाद, सौंदर्यवाद, जीवनवाद, कलावाद
5. वाड्मय विचारातील भूमिका
6. वाड्मय इतिहास लेखन

संदर्भग्रंथः


1. सौंदर्यमिमांसा – रा.भा. पाटणकर
2. सृष्टीसौंदर्य आणि मूल्यविचार – शरदचंद्र मुक्तीबोध
3. इतिहासाचे तत्वज्ञान – सदाशिव आठवले
4. ललितलेखन व शैली – वा.के. लेले
5. शैलीविज्ञान समीक्षा – रमेश धोंगडे
6. शैलीमीमांसा – दिलीप धोडंगे
7. साहित्यवेध – के.रं. शिरवाडकर
8. साहित्याचे तत्वज्ञान – वि.ना. ढवळे
9. वाड्मयीन वाद : संकल्पना आणि स्वरुप – सीताराम रायकर
10. साहित्यातील संप्रदाय – रा.शि. वाळिंबे
11. साहित्य आणि समाज – संपा. नागनाथ कोतापल्ले
12. वाड्मयीन संस्कृती – सुधीर रसाळ
13. वाड्मयतिहास लेखन संकल्पना आणि स्वरुप – द.दि. पुंडे
14. निवडक मराठी समीक्षा– गो.मा. पवार

## अभ्यासपत्रिका – चौथी – माहिती तंत्रज्ञान व मराठी वाङ्मयाचे अध्यापन

1. वाङ्मय अध्यापनाची उदिष्टये
2. भाषा अध्यापनाचे स्वरुप
3. अध्यापन पध्दती
   - व्याख्यानपध्दती
   - चर्चापध्दती
   - प्रश्नोत्तर पध्दती
4. वाङ्मय अध्यापनाची सामग्री
   - टिपणे
   - संदर्भग्रंथातील उतारे
   - प्रश्न आणि प्रश्नाचे अनुक्रम

संदर्भग्रंथ :


1. साहित्य अध्यापन आणि प्रकार – श्री.पु. भागवत
2. कविता : स्वरूप आणि रसास्वाद – भा.ज. कविमंडन
3. मराठी कविता स्वरूप आणि विवेचन – निशिकांत ठकार
4. कविता संकल्पना निर्मिती आणि समीक्षा – वसंत पाटणकर
5. आधुनिक मराठी काव्य – दि.के. बेडेकर
6. शैक्षणिक तत्वज्ञान – लीला पाटील


* * *